# कुलाबा-वांद्रे-सीप्झ
# मेट्रो-३ मार्गावरील सीएसएमआयए टी १ स्थानक येथे भुयारीकरणाचा ३१ वा टप्पा पार

मुंबई, दि २१ सप्टेंबर २०२०- मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन द्वारे आज सीएसएमआयए टी-१ (आंतरदेशीय विमानतळ) स्थानक येथे भुयारीकरणाचा ३१वा टप्पा पार पडला. पॅकेज-६ च्या टेराटेक निर्मित तापी -१ या टनेल बोअरिंग मशिनद्वारे सहार ते सीएसएमआयए टी-१ (आंतरदेशीय विमानतळ) पर्यंतचे १.५ किमी अंतर ४४९ दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आले.यासाठी एकूण १०८० रिंग्सचा वापर करण्यात आला.

"सीएसएमआयए टी-१ (आंतरदेशीय विमानतळ) हे कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावरील सर्वात महत्त्वाचे स्थानक आहे. या स्थानकावरून दररोज एक लाखापेक्षा अधिक प्रवासी प्रवास करणे अपेक्षित आहे. सीएसएमआयए टी-१ स्थानक आंतरराष्ट्रीय व आंतरदेशीय विमानतळाना जोडले जाणार आहे व त्यामुळे रस्त्यावरील वाहनांची कोंडी कमी होण्यास मदत होईल", असे मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री रणजित सिंह देओल म्हणाले.

सीएसएमआयए टी-१ स्थानकाचे एकूण ५५% काम पूर्ण झाले आहे. सीएसएमआयए टी-१ (आंतरदेशीय विमानतळ), सीएसएमआयए टी-२ (आंतरराष्ट्रीय विमानतळ) व सहार रोड स्थानकांचा समावेश असलेल्या पॅकेज -६ चे एकूण ८५% भुयारीकरण पूर्ण झाले आहे. प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८७% भुयारीकरण व ६०% बांधकाम पूर्ण झाले आहे.

सध्या एकूण ७ टीबीएमद्वारे विविध भागात भुयारीकरण सुरू असून येत्या काही महिन्यात आणखी काही भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण होणे अपेक्षित आहे.

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com